## ‘उद्याचा विचार आजच...’ – सुबोध जावडेकर



**सुबोध जावडेकर** यांनी
या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण.

नमस्कार,

सर्वप्रथम, ‘विज्ञान कथा’ या वाङ्मयप्रकारासाठी मला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दिल्याबद्दल मी महाराष्ट्र फाउंडेशनचे मनापासून आभार मानतो. आणि त्याचबरोबर मासूम ही संस्था, साधना ट्रस्ट, भारतातली आणि अमेरिकेतली निवड समिती, या सर्वांनाही धन्यवाद देतो. हा पुरस्कार देऊन त्यांनी माझा गौरव तर केला आहेच, पण ‘विज्ञान कथा’ या वाङ्मयप्रकाराचाही गौरव केला आहे, असं मला वाटतं.

आणि याच भूमिकेतून मी या पुरस्काराचा स्वीकार करतो.

आज आपल्या आयुष्यात विज्ञानामुळे अनेक बदल होताहेत. नवे नवे प्रश्न पुढं येताहेत. कधी कल्पनाही केली नसेल असे नैतिक पेच समोर उभे राहताहेत. माणसा-माणसांतली नातीसुद्धा त्यामुळे बदलून जाणार आहेत. या बदलत्या नातेसंबंधांचा शोध घ्यावा, या भूमिकेतून मी विज्ञान कथा लिहितो. सुरुवातीच्या माझ्या कथांमध्ये परग्रह, अंतराळयानं, कालप्रवास अशा गोष्टी असत. अलीकडच्या माझ्या कथांमध्ये त्या येत नाहीत. पण त्या वेळी सुद्धा या गोष्टी माझ्या कथांच्या केंद्रस्थानी नव्हत्या. कारण विज्ञान कथा ही विज्ञानाची कथा नसून विज्ञानयुगात जगणाऱ्या माणसांची कथा असते, अशी माझी सुरुवातीपासूनच धारणा आहे.

विज्ञान कथा भविष्यात घडते, हे खरं आहे. असं जरी असलं तरी तो भविष्यकाळ हा आजच्या, इथं राहणाऱ्या माणसांचाच भविष्यकाळ असतो. त्यांच्या उद्याच्या आयुष्याचं चित्र रेखाटून विज्ञान


कथाकार आपल्या आजच्या जीवनावरच भाष्य करत असतो.


या चित्रणामध्ये अतिशयोक्ती असते, असं काहीजण म्हणतात. पण मला विचाराल तर त्यात अतिशयोक्ती तर नसतेच, उलट पुढील काळात काय काय बदल होतील, किती झपाट्याने होतील त्याचा अंदाज बांधण्यात आम्ही विज्ञान कथाकारच थोडे कमी पडतो.


आता बघा, विज्ञानकथेमध्ये आम्ही व्हीजीफोनचा उल्लेख खूप पूर्वीपासून करत असू. व्हीजीफोन म्हणजे व्हीडिओ कॉल करता येईल असा फोन. पण तेव्हा आम्ही असं गृहीत धरलं होतं की, असे फोन एकविसाव्या शतकात केव्हातरी अवतरतील. पण प्रत्यक्षात ते आधीच आले. ९४-९५साली. किंवा रोबॉट सर्जनचं उदाहरण घ्या. यंत्रमानव ऑपरेशन करतात हे आम्ही विज्ञान कथांमध्ये दाखवत होतो. पण ते वास्तवात केव्हा येईल असं आम्हाला वाटत होतं? आणखी पन्नास-शंभर वर्षांनी. प्रत्यक्षात दहा वर्षांपूर्वीच दिल्लीत पहिली रोबॉटिक सर्जरी झाली. आणि आज भारतात सत्तर ठिकाणी रोबॉट असिस्टेड सर्जरीची सोय आहे.

म्हणजे वैज्ञानिक प्रगतीचा वेग किती प्रचंड आहे, याची कल्पना करा. काही तज्ज्ञांच्या मते एकविसाव्या शतकात कम्पुटर चिप्स खूप स्वस्त होतील. कागदाहून स्वस्त. आकाराने अतिशय छोट्या होतील. कुठल्याही वस्तूत त्या बसवता येतील. डोळ्यावर लावायच्या कॉन्टॅक्ट लेन्समध्ये त्या बसवल्या तर तुमच्या डोळ्यासमोर कम्पुटरचा पडदा दिसू लागेल. तो इंटरनेटशी जोडून तुम्हाला हवी ती माहिती, हवं ते पुस्तक, हवं ते चित्र क्षणात समोर आणता येईल. कुठलीही माहिती पाठ करायची, लक्षात ठेवायची गरजच पडणार नाही. असं झालं तर काय होईल? विद्यार्थ्यांची परीक्षा कशी घेणार? आणि कसली घेणार? कुणाची कॉन्टॅक्ट लेन्स किती पॉवरफुल आहे, याची?

आज हृदयरोपणाच्या, मूत्रपिंडरोपणाच्या शस्त्रक्रिया अगदी कॉमन झाल्या आहेत. पण काही काही वेळा असं होतं की, शरीर तो नवीन अवयव स्वीकारत नाही. भविष्यकाळात तुम्हाला तुमचा क्लोन



बनवून ठेवता येईल. त्या क्लोनचं हृदय किंवा मूत्रपिंड काढून तुम्हाला बसवता येईल. हा क्लोन तुमच्या स्वत:च्या पेशींपासूनच बनवलेला असल्यामुळे तुमच्या शरीराने ते नाकारण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. पण मग त्या क्लोनच्या आयुष्याचं काय? त्याचं हृदय काढून घेऊन त्याला मारून टाकायचं? त्याला जगायचा अधिकार नाही? माझ्या काही कथांमधून यांसारख्या प्रश्नांना मी हात घातलाय.

डोळ्यांना दिसणारही नाहीत इतक्या सूक्ष्म आकाराचे नॅनो रोबॉट्स उद्या बनवले जातील. ते तुमच्या शरीरात घालून त्यांच्याकरवी शस्त्रक्रिया करता येईल. हृदयाच्या रक्तवाहिनीतले ब्लॉक्स ते काढून टाकतील. मेंदूतला ट्युमर कापून काढू शकतील. पण यामुळे होईल काय? मृत्यूचा दर आणखी कमी होईल. आणि वृद्धांची संख्या मात्र बेसुमार वाढेल.

पण याहीपेक्षा विलक्षण अशा समस्या मानवजातीसमोर उभ्या ठाकणार आहेत. नुकतंच शास्त्रज्ञांनी मेंदूत साठवलेल्या स्मृती पुसून टाकायचं तंत्र विकसित केलंय. बाकी सगळ्या आठवणी शाबूत ठेवायच्या आणि एखादी विशिष्ट आठवण तेवढी पुसून टाकायची, असं करता येतं. गेल्या वर्षी तर खोटी, कृत्रिम आठवण मेंदूत पेरण्यातही यश मिळालंय. म्हणजे जे घडलेलंच नाही, ते आठवण म्हणून तुमच्या डोक्यात भरता येईल. आज हे प्रयोग उंदरांवर यशस्वी झालेत, उद्या माणसांवरही यशस्वी होतील यात मुळीच शंका नाही.

विचार करा, असं झालं तर काय होईल? साक्षीदाराची साक्ष हा पुरावा मानून न्याय दिला जातो. त्याच्या मेंदूतली गुन्ह्यासंबधीची आठवण पुसूनच टाकली तर तो साक्ष कशी देणार? आणि त्यापेक्षा भयंकर म्हणजे एखाद्या निरपराध माणसाला गुन्हा करताना आम्ही स्वत:च्या डोळ्यांनी बघितलंय असं सांगणारे दहा साक्षीदार कोर्टात हजर झाले तर? आपली न्यायव्यवस्थाच कोलमडून पडणार नाही का? या कल्पनेवर आधारलेली एक कथा मी काही वर्षांपूर्वी लिहिली होती.

येत्या काळात अशा अनेक समस्यांना, नैतिक प्रश्नांना आपल्याला तोंड द्यावं लागणार आहे. आपली मनोवृत्ती, आपली वागणूक, विचार करायची पद्धत, नातीगोती, नीती-अनीतीच्या कल्पना – सगळं सगळं बदलून जाणार आहे. या सगळ्याचं चित्रण विज्ञानकथेत येतं. 'आजच वाचा, उद्यासाठी' अशी जाहिरात मध्यंतरी एक वर्तमानपत्र करत असे. ते विज्ञानकथेला अगदी चपखल लागू पडतं. ती तुम्हाला उद्याचा विचार आजच करायला भाग पाडते. कधी तुम्हाला सुखवते, कधी धोक्याचा इशारा देऊन सावध करते. एका परीनं, या बदलांना सामोरं जाण्याकरता तुम्हाला तयार करते. हे विज्ञानकथेचं खास वैशिष्ट्य आहे.

विज्ञानकथेचे जे अनेक पैलू आहेत, जी बलस्थानं आहेत, त्यांपैकी काहींचा उल्लेख मी केला. विज्ञान कथा म्हणजे काय, तिचं वेगळेपण नेमकं कशात आहे आणि आपल्या आयुष्यात तिचा रोल काय, हे सांगायची संधी या निमित्ताने मला मिळाली.

ती दिल्याबद्दल आयोजकांना धन्यवाद आणि माझे विचार ऐकून घेतल्याबद्दल तुम्हा सर्वांचे मन:पूर्वक आभार.

subodh.jawadekar@hotmail.com/9870369372